# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
## महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१.

*WWW.DVET.GOV.IN* *e-mail: dk_12dvet@YAHOO.COM* *Fax-* 22659235/22675628 *Phone No.* 22620604/293.


**तात्काळ/महत्वाचे**

क्रमांक २०/सीटीएस/खाजगीसंस्था/२००८/४२८
दिनांक - २५ सप्टेंबर २००८

प्रति,

सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

**विषय :- सन २००९-१० करिता कायम विनाअनुदान तत्त्वावर खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास परवानगी देणे, विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात जादा तुकड्या सुरु करणे, व्यवसाय बदल इत्यादींसाठी इच्छूक संस्थांकडून अर्ज मागविणेबाबत...**

**संदर्भ** :- संचालनालयाचे पत्र क्र. १२/एएफएन/२००१/(१२)/३०५, दिनांक ०३ नोव्हेंबर,२००१.

उपरोक्त विषयाचे संदर्भात आपणांस कळविण्यांत येते की, संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या आदेशानुसार नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र कायम विनाअनुदान तत्त्वावर सुरु करण्यासाठी तसेच विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात नवीन व्यवसाय / तुकड्या सुरु करणे, विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील जुने / कमी मागणी असलेल्या व्यवसायांचे नवीन तंत्रज्ञानावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रमात रुपांतर करणे इत्यादींसाठी सत्र २००९-१० करिता इच्छूक संस्था / केंद्राकडून अर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी वर्तमानपत्रात आवश्यक ती जाहिरात / प्रेस नोट आपल्या स्तरावर व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे स्तरावर देण्यांत येऊन औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी अर्ज स्विकारणे, त्यांची विहित मुदतीत निरीक्षण करणे,ा छाननी तक्त्यानुसार अर्जाची छाननी, प्राप्त झालेले अर्ज संचालनालयास सादर करणे इत्यादी बाबतचा कालबध्द कार्यक्रम सोबत (प्रपत्र-अ) देण्यांत आलेला आहे. या वेळापत्रकाचे तंतोतंत पालन करुन संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या सूचनेनुसार संचालनालयास सादर करावेत.

शासन निर्णय क्र.पीटीआय-१०००/(२४६)/व्यशि-१,दि.१५ एप्रिल,२००२ अन्वये औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करणे, विद्यमान केंद्रात अतिरिक्त अभ्यासक्रम / तुकड्या सुरु करणे, व्यवसाय बदल करणे इत्यादी सुधारित नोंदणी शुल्क रु.६,०००/- (रुपये सहा हजार फक्त) प्रति व्यवसाय / प्रति तुकडी तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या संस्थांच्या प्रस्तावावर आकारावयाचे विलंब शुल्क (नोंदणी शुल्कासह) रु.१२,०००/- (रुपये बारा हजार फक्त) प्रति व्यवसाय प्रति तुकडी आकारण्यांत यावे. तसेच अर्जासह माहिती पुस्तिका किंमत रु.५००/- (रुपये पांचेश फक्त) अशी असून याची सुधारित आवृत्ती आपण **दि. २९.०९.२००८** रोजी या कार्यालयातून घेऊन जावी. तरी यापूर्वी आपल्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या जुन्या माहिती पुस्तिका वितरीत न करता नवीन माहिती पुस्तिकेचे वाटप करण्यांत यावे.

**नवीन पुस्तिका घेऊन जाते वेळी जुन्या माहितीपुस्तिकांचा वर्ष निहाय हिशोब खालील दिलेल्या प्रपत्रात सादर करावा.**

| अ.क्र | प्रादेशिक कार्यालयाचे नाव | वर्ष | संचालनालयाकडून प्राप्त झालेल्या पुस्तिकांची संख्या | विक्री करण्यांत आलेल्या पुस्तिकांची सख्या | शिल्लक असलेल्या पुस्तिकांची सख्या | पुस्तिक विक्रीतून जमा झालेला एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

वरील सूचनांन्वये तसेच संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या आदेशानुसार तात्काळ कार्यवाही करुन आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यांत यावा.

सही/

**( ज. द. भुतांगे )**

**संचालक(प्रशिक्षण),**

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,**

**महाराष्ट्र राज्य,मुंबई- ४०० ००१.**

# प्रपत्र "अ"

## इच्छूक संस्थांकडून अर्ज स्विकारणे, त्याची छाननी करणे, परवानगीसाठी शिफारस करणे याबाबतचे

# वेळापत्रक

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | सुधारीत दिनांक |
|---|---|---|
| १ | नवीन संस्थांसाठी अर्ज मागविणेबाबत वर्तमानपत्रात जाहिरात / प्रेस नोट देणे. | ०६.१०.२००८ पुर्वी |
| २ | अर्ज विक्रिची तारीख. | ०८.१०.२००८ पासून |
| ३ | अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख. | ०३.११.२००८ |
| ४ | विलंब शुल्क आकारुन नवीन अर्ज स्विकारणे. (अंतिम तारीख) | १५.११.२००८ |
| ५ | जिल्हा स्तरावर अर्जाची छाननी करणे. | २४.११.२००८ पर्यंत |
| ६ | प्रादेशिक कार्यालयांकडे प्रस्ताव सादर करणे. | २६.११.२००८ पर्यंत |
| ७ | प्रादेशिक कार्यालय स्तरावर अर्जाची छाननी करणे. | ०१.१२.२००८ पर्यंत |
| ८ | संचालनालयाकडे प्रस्ताव सादर करणे. | ०५.१२.२००८ पर्यंत |

# प्रेस नोट

१. नव्याने खाजगी कायम विनाअनुदानीत औ.प्र.कैंद्र सुरु करण्यासाठी,

२. विद्यमान खाजगी कायम विनाअनुदानीत औ.प्र.केंद्रात सुरु असलेल्या व्यवसायांना

डी.जी.ई.टी, नवी दिल्ली यांची सलग्नता प्राप्त आहे (प्रथम व तिसरी) व त्यांना दुस-या पाळीत दुसरी वा चौथी तुकडी सुरु करण्यासाठी,

३. ज्या .विद्यमान खाजगी कायम विनाअनुदानीत औ.प्र.केंद्रांना अ दर्जा प्राप्त झालेला असून दुस-या पाळीत व्यवसाय प्रशिक्षण सुरु आहे अशा औ.प्र.केंद्रांना तिस-या पाळीत व्यवसाय सुरु करण्यासाठी,

४. अनुदानित/ विनाअनुदानित/ अभियांत्रिकी महाविद्यालये/ तंत्रनिकेतने यामध्ये कायम विनाअनुदानीत तत्वार व्यवसाय अभ्यासक्रमाची दुसरी पाळी सुरु करण्यासाठी

अशा संस्थांकडून विहित नमून्यातील अर्ज मागविण्यांत येत आहेत. अर्जाची किंमत रु. ५००/- (ना परतावा ) एवढी असून अर्ज करण्यांची **अंतीम तारीख ०३/११/२००८** आहे. व **विलंब शुल्कासह अर्ज करण्याची अंतीम तारीख १५/११/२००८ आहे.** तरी इच्छुक नोंदणीकृत संस्थांनी अर्जाचा नमूना, पात्रतेच्या अटी, अर्ज करण्यांची पध्दती, अर्जावर होणारी कार्यवाही व इतर सविस्तर माहितीसाठी त्या-त्या जिल्हयातील जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा व विहित मुदतीत अर्ज सादर करावा तसेच विहित मुदतीनंतर केलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत, व यापुर्वी केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**संचालक (प्रशिक्षण)**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण**
**संचालनालय, म.रा., मुंबई -१.**